आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१३ जून २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- अहमदाबादच्या अपघातग्रस्त विमानाचा डिजिटल व्हिडीओ रेकॉर्डर मिळाला/ प्रधानमंत्र्यांची दुर्घटनास्थळी भेट

- भारतीय निवडणूक कायद्यांनुसार, मतदारांची नावं केंद्रीकृत स्वरूपात समाविष्ट करायची किंवा वगळण्याची कोणतीही तरतूद नसल्याचं मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांचं स्पष्टीकरण

- राज्यस्तरीय खरीप हंगाम २०२४-२५ पीक स्पर्धेत पहिले चार क्रमांकाचे मानकरी सातारा जिल्ह्यातले

**आणि**

- रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी मुसळधार पावसाचा रेड अलर्ट

**<><><><>**

अहमदाबादमधल्या अपघातस्थळावर गुजरातच्या दहशतवाद विरोधी पथकाला एक डिजिटल व्हिडीओ रेकॉर्डर मिळाला आहे. न्यायवैद्यकीय तज्ञांचं पथकही लवकरच घटनास्थळी पोहोचणार आहे. या दुर्घटनेनंतर अनेक स्थानिक रहिवासी बेपत्ता झाले असून त्यांचा शोध सुरू आहे. दुर्घटनेतल्या जखमींचे प्राण वाचवण्याच्या आशेनं अनेक जण रक्तदान करण्यासाठी मोठ्या संख्येनं पुढाकार घेत आहेत. तसंच, अहमदाबाद इथल्या लष्करी छावणीत भारतीय सैन्यानं रक्तदान शिबीर आयोजित केलं आहे. अपघातग्रस्तांच्या कुटुंबांसाठी रस्ते, गृहनिर्माण तसंच वाहतूक विभागाकडून निवास आणि वाहतुकीची व्यवस्था करण्यात आली आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी गुजरातमध्ये अहमदाबाद सरकारी रुग्णालयात जाऊ विमान अपघातात जखमी झालेल्यांची भेट घेतली. अपघातातून बचावलेले विमान प्रवासी रमेश विश्वासकुमार यांच्याशी त्यांनी संवाद साधला. या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्या कुटुंबाची भेट घेऊन त्यांनी शोक व्यक्त केला. त्यानंतर मोदी यांनी संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन परिस्थितीचा आणि

बचाव कार्याचा आढावा घेतला. अहमदाबादमधल्या या दुर्घटनेचा आपल्या सर्वांना धक्का बसला आहे. इतक्या क्षणार्धात एवढे जीव गमावण्याचं दुःख शब्दात व्यक्त करता येणार नाही. सर्व शोकाकुल कुटुंबांच्या दुःखात आपण सहभागी आहोत, अशी प्रतिक्रिया प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिली आहे.

अहमदाबाद विमानतळावरून लंडनकडे निघालेलं विमान अवघ्या काही क्षणातच विमानतळाजवळ कोसळल्यानं काल हा अपघात झाला. या अपघातात १२ कर्मचाऱ्यांसह २४१ जणांचा मृत्यू झाला. अपघात स्थळावर आजही मदतकार्य सुरू आहे. दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या मृतदेहांची डीएनएच्या मदतीने ओळख पटवण्याचं काम सुरू असून, ओळख पटलेले मृतदेह शवविच्छेदनानंतर कुटुंबांकडे सुपूर्द केले जात आहेत. आतापर्यंत सहा मृतदेह संबंधित कुटुंबांकडे सुपूर्द करण्यात आले आहेत. दरम्यान, अहमदाबादच्या सरकारी रुग्णालयात सध्या ३२ जणांवर उपचार सुरू असून गंभीररीत्या होरपळलेले काही रुग्ण वगळता अन्य सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. राकेश जोशी यांनी दिली आहे.

- **होल्ड बाईट - राकेश जोशी**

या दुर्घटनेबद्दल देशोदेशीच्या नेत्यांनी शोक व्यक्त केला आहे.

दरम्यान, या विमान दुर्घटनेच्या तपासात अमेरिकेच्या राष्ट्रीय वाहतूक सुरक्षा मंडळाचं तपास पथक चौकशीसाठी भारतात दाखल होणार आहे, या तपासात भारतीय अधिकाऱ्यांना हे पथक मदत करणार असल्याचं सुरक्षा मंडळानं समाज माध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><>**

अहमदाबादमध्ये झालेल्या विमान अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये राज्यातल्या सात जणांचा समावेश आहे. यातले पाच जण एअर इंडियाचे कर्मचारी होते. वैमानिक कॅप्टन सुमित सभरवाल हे पवईचे रहिवासी होते. तर त्यांचे सहकारी दीपक पाठक हे बदलापूरचे रहिवासी होते. डोंबिवली इथल्या रोशनी सोनघरे, पनवेलच्या मैथिली पाटील आणि गोरेगाव, मुंबई इथल्या अपर्णा महाडिक हे कर्मचारीही विमानात होते. सांगली जिल्ह्यातले महादेव पवार आणि त्यांच्या पत्नी आशा पवार हे प्रवासीही या दुर्घटनाग्रस्त विमानात होते.

**<><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या वेळी मतदारयादीत नावांची भर घालणं किंवा नावं वगळणं याबाबत केले गेलेले दावे अतिशयोक्त असल्याचं राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी म्हटलं आहे. भारतीय निवडणूक कायद्यांनुसार, मतदारांची नावं केंद्रीकृत स्वरूपात समाविष्ट करायची किंवा वगळण्याची कोणतीही तरतूद नसून मतदान केंद्रनिहाय मतदार यादी तयार केली जाते, असं त्यांनी स्पष्ट केलं. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीबद्दल प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखाच्या अनुषंगाने काही बाबी स्पष्ट करणं गरजेचं असल्याचं त्यांनी सांगितलं. मतदार यादी तयार करताना सर्व राजकीय पक्षांशी सतत माहितीची देवाणघेवाण होते, त्यांना हरकती नोंदवायची संधी दिली जाते, असंही त्यांनी नमूद केलं.

**<><><><>**

राज्यस्तरीय खरीप हंगाम २०२४-२५ पीक स्पर्धेत पहिले चार क्रमांक सातारा जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांनी मिळवले आहेत . सातारा जिल्हा कृषी अधीक्षकांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे. भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग आणि सूर्यफूल अशा ११ पिकांसाठी ही स्पर्धा राज्यस्तरावर घेण्यात आली होती. शेतकऱ्यांनी मिळवलेली उत्पादकता ही त्या पिकाच्या गेल्या पाच वर्षाच्या सरासरीच्या दीडपट किंवा त्याहून अधिक असल्यास ते या पुरस्कारासाठी पात्र ठरतात. राज्यस्तरावरचे विजेते ठरल्यानंतर, आता उर्वरित स्पर्धकांमधून जिल्हास्तरावरचे तसंच तालुकास्तरावरचे विजेते शेतकरी निवडले जाणार असून आदिवासी गटांकरिता स्वतंत्र विजेते घोषित करण्यात येणार आहेत.

**<><><><>**

जालना इथं काल विकसित कृषी संकल्प अभियानांतर्गत पोकळवडगाव आणि गोळापांगरी इथं शेतकरी मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आल्या. यावेळी शेतकऱ्यांना बियाणे खरेदी, बीज प्रक्रिया, बी-पेरणी, विविध पिकांची लागवड, सोयाबीन पिकासाठी बी.बी.एफ. तंत्रज्ञानाचा वापर तसंच बियाणे उगवण क्षमता चाचणी याबाबत माहिती देण्यात आली.

**<><><><>**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गौरवशाली इतिहासाचा आणि समृद्ध वारशाचा अनुभव देणारी "छत्रपती शिवाजी महाराज भारत गौरव पर्यटन रेल्वेचं" आज पहाटे कोल्हापूर

इथं आगमन झालं. आज याठिकाणी पर्यटक श्री अंबाबाई मंदिर आणि पन्हाळा किल्ल्याला ते भेट देतील. रेल्वे मंत्रालय आणि राज्य सरकारच्या संयुक्त विद्यमाने नऊ तारखेला मुंबई इथून ही गाडी पर्यटनासाठी रवाना झाली होती.

<><><><>

परभणी जिल्ह्यात पूर्णा इथं आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर आज योग शिबिर घेण्यात आलं. शहरातील विद्या प्रसारणी शाळेच्या सभागृहात समर्थ प्रभात योग समिती आणि आर्ट ऑफ लिव्हिंग यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर घेण्यात आलं. यावेळी योग प्रशिक्षकांनी विविध आसनांची प्रात्यक्षिकं सादर केली त्यानंतर योग जनजागरण फेरी काढण्यात आली.

<><><><>

मातंग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी बार्टीच्या धर्तीवर 'आर्टी' संस्थेचे सक्षमीकरण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. काल मातंग समाजाच्या मागण्यासंदर्भात फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ते बोलत होते. यासाठी अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरणासाठी निवृत्त न्यायमूर्ती अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असल्याचं त्यांनी सांगितलं. मातंग समाजाच्या सघटनांनी आपल्या मागण्या लेखी स्वरूपात समितीकडे सादर कराव्यात. येणाऱ्या जातनिहाय जनगणनेमध्ये लोकसंख्येच्या आधारे वर्गीकरणात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येईल, असंही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

<><><><>

दक्षिण मुंबईतल्या कामाठीपुरा भागाच्या समूह पुनर्विकास प्रकल्पाचा  बांधकाम कंत्राटदार आणि विकासकाच्या नियुक्तीसाठी काल निविदा सूचना प्रसिद्ध  करण्यात आली आहे. अत्यंत मोक्याच्या ठिकाणी वसलेल्या या ३४ एकर क्षेत्रातील इमारती सुमारे १०० वर्षे जुन्या आहेत.  म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळामार्फत राबवल्या जाणाऱ्या या प्रकल्पातून रहिवाशांना मोठ्या आणि सुरक्षित सदनिका मिळतील तसंच नियोजनबद्ध पायाभूत सुविधांचा विकास करण्यात येणार आहे.

<><><><>

जागतिक क्रिकेट कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण अफ्रीका यांच्यात लंडन इथं लॉर्ड्सवर सुरू असलेल्या अंतिम लढतीच्या दुसऱ्या दिवस अखेर ऑस्ट्रेलियाची धावसंख्या ८ गड्यांच्या मोबदल्यात १४४ झाली होती. दिवस अखेर ऑस्ट्रेलियाने २१८ धावांची आघाडी घेतली होती. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सनं उत्कृष्ट गोलंदाजी करत २८ धावांच्या मोबदल्यात ६ गडी बाद केले.

**<><><><>**

हवामान विभागानं आज रत्नागिरी आणि सिंधुदुर्गसाठी रेड अलर्ट दिला आहे. मुंबई आणि पालघर वगळता कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातल्या इतर जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे. विजांच्या कडकडटासह याठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. उद्यासाठी रायगड, रत्नागिरीत रेड अलर्ट असून पालघर वगळता कोकणातल्या इतर जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे. उर्वरित महाराष्ट्रातही येत्या २ दिवसात जोरदार पावसाची शक्यता आहे.

**//<><><><>//**